# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

वर्ष : अठरावे
सप्टेंबर २०२६
अंक : नववा

मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ४०


## लोकमाता गोदावरी

चंद्रकला कुलकर्णी । एल. के. कुलकर्णी

'दक्षिणगंगा' असलेल्या गोदावरी नदीची महती सांगणारे हे वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक ! तिचे भौगोलिक बारकावे, बहुराज्यीय प्रवास, सांस्कृतिक स्थानमाहात्म्य, कुंभमेळ्यासह इतर सांस्कृतिक प्रथा - परंपरा आणि त्या अनुषंगाने येणारे अर्थकारण या सर्वांच्या विस्तृत माहितीचा हा संदर्भसखा...



# कॅडबरी

## निकेतन तावडे

आज भारतात अनेक चॉकलेट उत्पादक दाखल झाले आहेत, परंतु कॅडबरीचं स्थान मात्र भारतीय मार्केटमध्ये आणि भारतीयांच्या मनात अढळ आहे. चहाच्या व्यापारातून सुरू झालेल्या एका छोट्या दुकानाचं एका मोठ्या उद्योगाच्या साम्राज्यात रूपांतर होण्याच्या पाठीमागे होते अथक प्रयत्न, सहनशीलता, चातुर्य, प्रत्येक पिढीनं दिलेलं योगदान, कर्मचाऱ्यांनी दिलेली प्रामाणिक साथ आणि ग्राहकांचा विश्वास.... याचीच ही चित्तवेधक कहाणी ....



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

# राजहंस ग्रंथवेध

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
गौरव करोशी

अक्षरजुळणी :
मुग्धा दांडेकर

वर्ष अठरावे :
अंक नववा
१५ सप्टेंबर २०२६

मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- अमृतमहोत्सवी संस्मरण
  आरती घारे / ९
- संवाद 'राजहंसी' लेखकांसोबतचा
  विशाखा पाटील यांच्याशी सारंग दर्शने
  यांनी साधलेला संवाद / १३
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *'लोकमान्य ते महात्मा'* - दीपक बोरगावे / २१
- आम्हां असे अभिमान
  *सुबोध बायबल (नवा व जुना करार)*
  - फादर फ्रान्सिस दिब्रिटो / २५
- असे जन्मले पुस्तक!
  *चंद्रावती रामायण* -
  डॉ. माधवी भट / २९
- क... कवितेचा
  - भूषण सहदेव तांबे / ३२
- राजहंसी पार / ३३
- वाचकांच्या मनातलं... / ३६

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके

संवेदनशील कवी, कादंबरीकार, जाणकार रसिक असलेल्या
**विलास शेळके** यांच्या अनुभवक्षणांची
ही पूर्व-मध्य-पश्चिम जगाची अनोखी सफर घडवणारी अक्षरयात्रा...
जरूर वाचावीत व संग्रही ठेवावीत अशी प्रवासवर्णनपर पुस्तके...




पूर्वायन

किंमत : ₹ ४३०/-




मध्यमायन

किंमत : ₹ ३५०/-




पश्चिमायन

किंमत : ₹ ५००/-

टपालखर्च प्रत्येकी
₹ १००




गोमंतकाच्या हिरव्यागर्द शेताभाटांत वाढलेल्या;
पावसापाण्यात, पागोळ्यांत मनसोक्त भिजलेल्या एका
निसर्गवेड्या मनस्वी मुलीच्या जडणघडणीच्या आणि
व्यावसायिक स्थैर्याच्या प्रवासातील हे कटू-गोड
जीवनानुभवांचं तिच्या भावओंजळीत उरलेलं
निवळशंख पाणी...
वाचकांची जीवनमूल्यांवरील श्रद्धा दृढ करणारं !

## निवळशंख पाणी

डॉ. रेवा दुभाषी

किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. ₹ १००)

# संपादकीय

## रंग उगवतीचे... चैतन्याचे!

*मानवी मनाला नित्यनूतनतेचा ध्यास हवा; त्याच्या जोडीला समृद्ध जगण्याचं शाश्वत तत्त्व ज्यांत सामावलंय अशी मूल्यं, विचार सदोदित आपल्या चिंतनाची भूमी व्हायला हवेत. त्यासाठीच हे मुक्त चिंतन.....*

वाचकहो, नमस्कार.

ग्रंथवेधचा सप्टेंबर महिन्याचा अंक आपल्या हाती देताना आम्हांला अतिशय आनंद होतोय. ग्रंथवेधच्या विविध सदरांच्या माध्यमातून 'राजहंसी' नवनवीन पुस्तकांचा परिचय, त्यांचे अंतरंग, वाचकांचे अभिप्राय, राजहंसी विविध साहित्यदालनांची मुक्त भटकंती आम्ही तुम्हाला घडवत असतो. त्याचबरोबर आता बदलत्या काळावर स्वार होत आम्ही तंत्रज्ञान हाताशी घेऊन वेगवेगळ्या डिजिटल माध्यमांतूनही तुम्हां जाणत्या वाचकांशी संवादत आहोत. प्रकाशक-लेखक-वाचक या त्रिपुटीतील सौहार्द अखंडित राहण्यासाठी हा संवाद आवश्यकच आहे. मानवी मनाला नित्यनूतनतेचा ध्यास हवा; त्याच्या जोडीला समृद्ध जगण्याचं शाश्वत तत्त्व ज्यांत सामावलंय ती मूल्यं, ते विचार सदोदित आपल्या चिंतनाची भूमी व्हायला हवेत. त्यासाठीच येथे चिंतनासाठी काही मौलिक तुमच्या समोर ठेवावं असं नेहमीच मनात असतं. *'समुद्र बिलोरी ऐना, सृष्टीला पाचवा म्हैना'* पाचूसारखीच हिरवीगार साडी नेसलेल्या श्रावणातील सृष्टीला बा. भ. बोरकर समुद्राच्या बिलोरी आरशात तिचं उमलू उमलू येत असलेलं प्रसन्न रूप निरखायला सांगतात. सृष्टीच्या अशा सृजन सोहळ्यात आपल्याही मनाला नवतेची पालवी फुटायला हवी. म्हणूनच श्रावणसरी झेलता झेलता चिंब झालेल्या, सृजनाची भूमी अंकुरून सर्वत्र हिरवाईनं नटलेल्या सृष्टीला निरखणाऱ्या तुमच्या आमच्या मनाला आपल्याच आत डोकावण्यासाठीचं एक चिंतन इथे मांडत आहे. आत्ताच्या अवतीभवतीच्या उत्सवी वातावरणात हे चिंतन आपल्याला 'जगण्याचाच उत्सव' करणं किती महत्त्वाचं आणि मौलिक आहे हे सांगेल असा भरवसा वाटतो.

एरिक फ्रॉम हा एक जगप्रसिद्ध जर्मन-अमेरिकन मानसशास्त्रज्ञ होता. त्याच्या *‘टू हॅव ऑर टू बी (To Have or to Be?)* या जगप्रसिद्ध ग्रंथात त्यानं माणसाच्या जीवन जगण्याच्या दोन पद्धतींचं फार सुरेख वर्णन केलंय. त्याच्या मते, माणसाचं जीवन आणि समाजाची रचना प्रामुख्यानं दोन दृष्टिकोनांवर चालते, एक म्हणजे असणं (To Be) ही आपल्या अस्तित्वाची अशी स्थिती आहे जिथे माणसाची किंमत त्याच्या मालमत्तेवरून ठरत नाही, तर तो काय अनुभवतो, कसा जगतो आणि इतरांशी त्यांचे संबंध कसे आहेत यावरून ठरते. या स्थितीत व्यक्ती ही कायम जीवनाचा आनंद घेण्यासाठी, शिकण्यासाठी, प्रेम करण्यासाठी आणि इतरांना हे सर्व देण्यासाठी उत्सुक असते. बाह्य वस्तू गोळा करण्यापेक्षा आंतरिक विकसनाला प्रेरक होईल त्याचीच संगत त्याला प्रिय वाटते. वस्तुत: जे श्रेयस्कर आहे तेच प्रेयही ठरावे, अशी घटना केवळ ज्ञानी माणसांच्या बाबतीतच शक्य असते. कठोपनिषदात श्रेयालाच ‘विद्या’ असं म्हटलंय. दुसरा दृष्टिकोन म्हणजे *'To Have'* ही वृत्ती. ‘असणे’ऐवजी ‘माझे असणे किंवा बाळगणे’ ही वृत्ती. अशा वृत्तीची व्यक्ती आयुष्यभर वस्तू गोळा करण्याभोवतीच फिरत राहते. आजच्या काळात आपल्याला काय दिसतं? हीच आधुनिक उपभोक्तावादी वृत्ती मोठ्या प्रमाणात दिसून येतीय. अशा वृत्तीनं आपण जगू लागलो तर कायम असुरक्षितता आणि भीती वाटत राहते. कधी आपली मालमत्ता गमावण्याची भीती, तर कधी प्रिय व्यक्ती, वस्तू गमावण्याची भीती वाटत राहते. एरिक फ्रॉम म्हणतो तसं ‘टू बी’ असणं हे आपल्या जीवनाला अर्थ देणारं, आनंद देणारं आहे. आपल्याला मानसिक शांतता देणारं आहे; तर टू हॅव म्हणजेच ‘माझे असणे किंवा बाळगणे’ ही वृत्ती आपल्याला आसक्त बनवणारी आहे. आजच्या आधुनिक काळात समाजात हेच चित्र दिसतंय. लोकांनी असण्यापेक्षा असल्यासारखे दाखवण्याला आणि गोळा करण्याला महत्त्व दिल्यामुळे आपली आंतरिक शक्ती कमी होऊ लागली आहे आणि आपण आनंदासाठी बाह्य वस्तूंवर अवलंबून राहू लागलो आहोत. आपल्याला जर खरोखरच सुखी-समाधानी व्हायचं असेल तर बाळगण्याच्या *(To Have)* मोहातून बाहेर पडून असण्याच्या *(To Be)* मार्गावर चालायला हवंय. हे अगदीच मान्य की, हा प्रवास सोपा नाही. ही साधना आहे, म्हटलं तर जीवनसाधना आहे. पण प्रयत्न करायला हवेत.

बालकवी म्हणतात तसं

*‘जीव धावतो वरवर जाया चैतन्यापाठी।*
*परि सुटेना जड भूमीशी दृढ बैसली गाठी!’*

अशी आपल्या मनाची द्वंद्वात्मक स्थिती होत असते. दिसते, पण हाती लागत

नाही; ओढ लावते, पण दूर दूर सरकत राहते ते दुर्लभ चैतन्य आपल्या जाणिवेचा एक अविभाज्य भाग व्हायला हवा. जड अशा या जगात वावरताना त्याच्या तळाशी असलेल्या चैतन्याला जागवणं नक्कीच सोपं नाही. त्यासाठी आधार हवा प्रेरक विचारांचा, शाश्वत मूल्यांचा!

हे संचित गवसतं अक्षर-संगतीतून....मग ती पुस्तकांची-ग्रंथांची असो, निसर्गाची असो अथवा विवेकयात्री व्यक्तींची असो. मेधावी प्रतिभेची देणगी लाभलेल्या जिवाला ही आस सदैव असते. इंद्रियांचे कितीही लाडकोड पुरवले तरी अतींद्रियाचं गूढ आकर्षण असणं हे माणूसपण उजळवणारं आहे. त्यासाठी आपला देह जरी भूमीशी जोडलेला असला तरी आकाशाची ओढ असावी. असं घडलं तर मनातली भौतिक विचारांची धूळ हळूहळू उडून जाईल आणि शांतलं मन केवळ असण्याशीच जोडून राहील. मग *'अंतरिक्ष फिरलो, पण गेली न उदासी!'* अशी म. म. देशपांडे यांनी वर्णिलेली मनाची अतृप्त वास्तव स्थिती झाली तरी ती आपण स्वस्थतेनं समजून घेऊ शकू. आपण या भूमीचे आहोत आणि आकाशाचेही आहोत हे आपणास उमगेल. ही अनुभूती जगण्यातील व्यर्थतेची जाणीवही प्रगल्भतेनं करून देईल आणि मग बालकवी म्हणतात तसं *'आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे....'* याच भावस्थितीचा आपलं मन धनी होईल. हा संपूर्ण भावप्रवास तेव्हाच शक्य आहे, जेव्हा आपण अवतीभवतीच्या भौतिक प्रगतीच्या, तंत्रज्ञानाच्या गतीपासून अलिप्त होऊन स्वत:पाशी येऊ, विसावू आणि स्वत:च्याच आत डोकावू. अशा चिंतनशील स्थितीत केलेलं वाचन म्हणजेच जगण्याचा उत्सव आहे. भौतिक जगातील उत्सव संस्कृतिसंवर्धक आहेत; तर आपल्या आत नित्य सुरू राहायला हवा असा जगण्याचा उत्सव उज्जीवक आहे.

आमचं 'राजहंसी' साहित्यदालन वाचकांच्या या भावप्रवासात सदोदित सोबत आहे. वाचकांचं आयुष्य सर्वार्थानं सुंदर व्हावं, ते चिंतनशील व्हावेत यासाठी गेल्या ७५ वर्षांच्या काळात उत्तमोत्तम साहित्यकृती प्रकाशित करून, प्रतिभावान साहित्यिक आणि जाणते वाचक यांचं हार्दिक मैत्र जोडून आम्ही हा सेतू पुढे नेत आहोत. अमृतकाळात 'राजहंसी' साहित्यकृतींना सुवर्णझळाळी, हीरकझळाळी प्राप्त करून देण्यात, त्यांच्या तेजाचे शतकण सर्वदूर विखुरण्यात तुम्हां वाचकांचंच मौलिक योगदान आम्हास लाभणार आहे. त्यासाठी आपण आमच्याशी असेच जोडून राहाल, आपले अभिप्राय आमच्यापर्यंत पोहचवाल ही सदिच्छा व्यक्त करते आणि थांबते.

धन्यवाद.

**डॉ. प्रिया निघोजकर**
कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




परकीय भाषांतील वेचलेल्या वेधक, अद्भुत कथा.
सदासर्वकाळ टवटवीत वाटणाऱ्या आणि
सर्वांनाच आपल्या वाटतील अशा...
तेव्हा जरूर वाचा -

### गवसलेल्या गोष्टी

डॉ. चंद्रशेखर फणसळकर

किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. ₹ १००)




या सुरस कथा आहेत... जन्म-मृत्यू, व्याधी, दुःख,
स्वार्थ, परमार्थ अशी विविध आशयसूत्रं हाताळणाऱ्या...
परिचिताला अपरिचित बनवणाऱ्या...
वास्तव आणि फँटसी यांमध्ये पूल सांधणाऱ्या...

### कथा चाळिशी

डॉ. चंद्रशेखर फणसळकर

किंमत : ₹ ३९०/- । (ट.ख. ₹ १००)




अकोला शहराचे कलात्मक, साहित्यिक, सांस्कृतिक
पर्यावरण समृद्ध करणारे चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व
म्हणजे प्रा. पंढरीनाथ मांडवगणे.
त्यांच्या संपन्न आयुष्यातील ही प्रतिभावंतांची मांदियाळी
वाचकांचंही आयुष्य समृद्ध करणारी आहे.

### प्रतिभावंतांची मांदियाळी

प्रा. पंढरीनाथ मांडवगणे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ १००)

# अमृतमहोत्सवी संस्मरण

*१ जून २०२६पासून राजहंस प्रकाशनाने अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने राजहंस परिवारातील सुहृदांनी व्यक्त केलेली मनोगते खास वाचकांसाठी सादर करीत आहोत.*

**राजहंस प्रकाशन नव्हे, राजहंस परिवार!**

नमस्कार वाचकहो,

राजहंसला ७५ वर्षं पूर्ण झाली आणि दिलीप माजगावकर सरांच्या प्रकाशकीय कारकिर्दीला ६० वर्षं पूर्ण झाली, हे आपण सगळे जाणताच. या प्रवासात काही काळापासून मलाही सहभागी होता आलं आणि अजूनही मी त्याचा एक भाग आहे, हे माझ्यासाठी खूप अभिमानाचं आणि समाधानाचंही आहे.

खरं तर मी इंजिनीयरिंगची विद्यार्थिनी. इलेक्ट्रोनिक कंपनीत नोकरी, मग स्वत:चा व्यवसाय. त्यानंतर वाचनाची आवड म्हणून एमए मराठी केलं. मग एसएनडीटी महाविद्यालयात अरुण फडके यांची शुद्धलेखन, मुद्रितशोधन, भाषा संपादन; यावरची कार्यशाळा केली. अरुण फडके सरांनीच कार्यशाळेतील काही जणांची नावं राजहंस प्रकाशनाकडे पाठवली होती. त्यांतील एक नाव माझं होतं. पण एवढ्या प्रथितयश संस्थेत आपल्याला संधी मिळेल का, अशी धाकधूक मनात घेऊनच मी इथे आले. कधीही, कुठलंही काम सोपं नसतंच. अनेकदा पाठपुरावा केल्यावर मला आधी मुद्रितशोधनाची कामं देण्यात आली. त्यात आनंद हर्डीकर सर आणि डॉ. सदानंद बोरसे सर यांनी मोलाचं मार्गदर्शन केलं. 'मुद्रितशोधन ही एक वेगळीच कला आहे आणि ते प्रत्येकाला जमतंच असं नाही.' हे माजगावकर सरांचं मत. त्यांनी कायमच माझ्या कामाला प्रोत्साहन दिलं.

अभय बंग, विजया मेहता, सई परांजपे, रत्नाकर मतकरी, फादर फ्रान्सिस दिब्रिटो, गिरीश कुबेर, विश्वास पाटील, अभिराम भडकमकर, विश्वास नांगरे पाटील इत्यादी मान्यवर लेखकांच्या पुस्तकांचं मुद्रितशोधन सुरुवातीच्या काळात मी केलं. त्याचबरोबर राजहंसच्या ग्रंथवेध या गृहपत्रिकेच्या मुद्रितशोधनाचं कामही मी करत होते. विनयाताईंकडून मला संपादनाच्या बाबतीतील अनेक गोष्टी त्या वेळी शिकायला

मिळाल्या. काळ थोडा पुढे सरकला आणि माझा 'राजहंस ग्रंथवेध'ची कार्यकारी संपादक म्हणून प्रवास सुरू झाला. त्या निमित्तानं माझा विनयाताईंशी आणि माजगावकर सरांशी जास्त संवाद सुरू झाला. पुढील वर्ष सुरू होण्याआधी येणाऱ्या अंकात कोणती नवीन सदरे सुरू करायची, लेखकांशी कधी संपर्क साधायचा, राजहंसच्या सर्व शाखांमध्ये काय उपक्रम सुरू आहेत याची माहिती मिळवायची अशा एक ना अनेक गोष्टी मी इथे शिकले.

ग्रंथवेधच्या संपादनाच्या निमित्तानं माझा राजहंसच्या अनेक लेखकांशी संवाद व्हायचा, पण महत्त्वाचं म्हणजे माजगावकर सरांशी असलेला संवाद वाढला. ग्रंथवेध राजहंसची मासिक गृहपत्रिका आहे, त्यामुळे वेळेचं खूप नियोजन लागायचं. प्रत्येक अंकात संपादकीय कोणत्या विषयावर लिहायचं, याबद्दल सरांशी बोलणं व्हायचं. मात्र एकदा काम सोपवलं की निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य त्या व्यक्तीला, हे राजहंसी धोरण इथेही होतच. दिवाळी अंकही असायचा. सर दोन-तीन महिने आधीच विचारायचे, 'दिवाळी अंकासाठी काही विषय निवडला आहेस का?' मग त्यावर चर्चा करून तो विषय पक्का करायचो आणि त्या अनुषंगानं काम सुरू व्हायचं. अंक वेळेत पूर्ण होऊन वाचकांपर्यंत वेळेत पोहोचायचा. ग्रंथवेधच्या संपादनाबरोबर इतर पुस्तकांच्या संपादनाचं कामही सुरू होतं. 'चाणक्य-चंद्रगुप्त-अशोक त्रिधारा' या संचातील तीन कादंबऱ्यांच्या मुद्रितशोधनाचं आणि त्यातील 'कलिंगसंहाराचा न्याय' या कादंबरीचं संपादनही मी केलं, तेव्हा शिरीष सहस्रबुद्धे सरांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. अनुवाद-साहित्याचं संपादन कसं करावं, नेमके शब्द कसे वापरावेत याचं जणू मार्गदर्शनच त्या कामातून मिळालं. त्यानंतर महत्त्वाची म्हणजे माजगावकर सरांची 'पत्र आणि मैत्र' आणि 'वाणी आणि लेखणी' ही दोन पुस्तकं. या पुस्तकांच्या संपादनात मी साहाय्य केलं. या दोन्ही पुस्तकांत जणू सरांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचा पर्यायानं राजहंस प्रकाशनाच्या वाटचालीचा आढावा आहे. तसेच त्यांनी अनेक मान्यवर व्यक्तींवर लिहिलेले लेख, वेळोवेळी केलेली भाषणं आहेत. सरांची स्मरणशक्ती, लेखनकौशल्य, पुस्तकनिर्मितीत त्यांनी सुचवलेले बदल, मुखपृष्ठ, मलपृष्ठ ....अशा कितीतरी गोष्टी ते काय दृष्टीनं बघतात, हे मला जवळून बघता आलं. राजहंसचे मान्यवर संपादक आनंद हर्डीकर सर, विनयाताई खडपेकर, डॉ. सदानंद बोरसे सर, करुणाताई गोखले यांची काम करण्याची पद्धत जवळून बघता आली आणि राजहंसची पुस्तकं सर्व बाबतीत उत्तम का होतात, याचं उत्तर मिळालं. त्याचा माझ्या कामात मला निश्चितच उपयोग झाला आणि होत आहे.

मला आठवतो, तो प्रसंग म्हणजे अरुण फडके सर उपचारांसाठी रुग्णालयात दाखल झालेले होते, आणि त्यांची इच्छा होती की, राजहंस प्रकाशनाचं एक तरी पुस्तक आपण संपादित करावं. ही गोष्ट मी माजगावकर सरांच्या कानावर घातली आणि त्यांनी माधव गाडगीळ सरांचं 'उत्क्रांती-एक महानाट्य' हे पुस्तक त्यांना संपादनासाठी दिलं. दुर्दैवानं काही महिन्यांतच फडके सरांचं निधन झालं.

पण त्यांना आपण राजहंसचं पुस्तक संपादित केलं याचं समाधान नक्कीच मिळालं असेल. आणखी एक गोष्ट म्हणजे अरुण फडके सरांचं निधन झाल्यावर त्यांच्या व्याकरणविषयक पुस्तकांचं योगदान ओळखून राजहंस प्रकाशनानं ती पुनर्मुद्रित केली. मला राजहंस प्रकाशनाचं हे वेगळेपण आहे, असं नक्कीच वाटतं. आणि हो, एखाद्या व्यक्तीला काही वेगळं करायचं असेल, तर त्याला इथे प्रोत्साहनही मिळतं बरं का! माझंच सांगते, मी शुद्धलेखन, मुद्रितशोधन आणि भाषा संपादन याविषयी ऑनलाईन कार्यशाळा घेऊ का, असं विचारल्यावर माजगावकर सरांनी त्याला लगेच होकार दिला. आम्ही पहिल्या कार्यशाळेची जाहिरात तर ग्रंथवेधमध्येही दिली होती, आणि त्यानंतर घेतलेल्या कार्यशाळांची जाहिरात राजहंसच्या फेसबुकवर, वेबसाईटवर देतो.

राजहंस एक संस्था तर आहेच, त्यापेक्षाही एक कुटुंब, एक परिवार आहे; त्यामुळेच सर्व जण इथे मनापासून काम करतात, एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होतात. आम्ही खंडेनवमीला अगदी कुटुंबाप्रमाणे एकत्र येऊन पूजा करतो. हा एक कौटुंबिक सोहळाच असतो म्हणा ना! आमचे कुटुंबप्रमुख माजगावकर सर, आमच्या रेखाताई त्या दिवशी अगदी प्रेमानं प्रत्येकाला खाऊ देतात, प्रत्येकाची विचारपूस करतात. काही वेळा अनौपचारिक पुस्तक प्रकाशनही राजहंसमध्ये होते. कधी कुणाचे वाढदिवस, तर कधी एखाद्या क्षेत्रातील यश साजरं केलं जातं. हे सर्व सांगायचं कारण म्हणजे आज ७५ वर्षं पूर्ण झालेल्या राजहंस प्रकाशन या संस्थेतील वातावरण अगदी छान आहे. कामाच्या वेळी काम तर होतच असते, पण अशा एखाद्दुसऱ्या कार्यक्रमामुळे थोडासा विरंगुळाही मिळतो.

अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांबरोबर अनेकांना वैचारिक आणि बौद्धिक भूक भागवण्याची गरज असते. माझी ती गरज राजहंसमध्ये येऊन पूर्ण झाली, याचं कारण पुस्तकांच्या बाबतीत इथं असणारं विषयाचं वैविध्य आणि आशयाची समृद्धी इथं येणाऱ्या प्रत्येकाला आपणही या संस्थेचा भाग व्हावं, असं मनापासून वाटतं ते काही उगीच नाही.

वाचकहो, 'गेम ऑफ थ्रोन्स' या प्रसिद्ध पुस्तकाचा लेखक जॉर्ज आर. आर. मार्टिन म्हणतो, 'ज्याला वाचनाची सवय आहे, तो मरणापूर्वी हजार आयुष्ये जगतो; पण जो वाचत नाही तो फक्त एकच आयुष्य जगतो आणि अशी आयुष्यं जगण्यासाठी विविध प्रकारचं दर्जेदार साहित्य प्रकाशित करणाऱ्या प्रकाशन संस्थांची गरज आहे.' मी तरी हजार आयुष्यं जगायचं ठरवलं आहे, त्यासाठी अमृतकाळात प्रवेश केलेल्या राजहंस प्रकाशन या संस्थेला पर्याय नाही, असं मला तरी वाटतं. धन्यवाद.



**आरती घारे**
संपादक, राजहंस प्रकाशन
९३७०५६०२४८

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




पूर्व बंगालमधील सोळाव्या शतकातील कवयित्री चंद्रावतीचा डॉ. माधवी भट यांनी करून दिलेला हा सुरस परिचय. बंगालच्या लोकगीतांचा दरवळ, तेथील स्त्रीमनाचा उत्कट आविष्कार आणि रामायणाचं स्त्रीदृष्टीनं केलेलं हे आस्वादन...

### चंद्रावती रामायण

डॉ. माधवी भट

किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ १००)

आयुष्यातील पासष्ट वर्षे जंगलात वास्तव्य केलेल्या, प्राणिजीवनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास केलेल्या अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचा कुमारवयीन मुलामुलींना करून दिलेला हा सुबोध चरित्रात्मक परिचय...




### मुलांचे चितमपल्ली

डॉ. उमेश करंबेळकर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ १००)




कामगारांचा मूलभूत हक्क जपण्यासाठी व त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक असे कामगार कायद्यांतील बदल कामगारांना सोप्या भाषेत समजून सांगणारे, सुलभ मराठीत कायद्याची मांडणी केलेले हे पुस्तक. कामगार, व्यावसायिक, उद्योजक व कायदेतज्ज्ञ यांनी आवर्जून संग्रही ठेवावे असे पुस्तक...!

### नवे कामगार कायदे आणि आपण

डॉ. अनंत सरदेशमुख

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ १००)

# संवाद 'राजहंसी' लेखकांसोबतचा

*'राजहंसी' लेखकांचे साहित्य, त्यांची सर्जनप्रक्रिया, त्यामागील प्रेरणा, वाचकांचा प्रतिसाद अशा विविध अंगांनी त्यांच्या लेखनाचे पैलू उलगडणारे हे सदर...*

*राजहंसच्या संपादक विशाखा पाटील यांच्याशी त्यांच्या लेखनप्रवासाविषयी आणि साहित्यकृतीविषयी ज्येष्ठ पत्रकार, संपादक सारंग दर्शने यांनी साधलेला हा मुक्त संवाद...*

*नमस्कार.*

*तुमच्या 'धागे अरब जगाचे', 'सावध ऐकाष्ठ चीन-पाकिस्तान युती : एक आव्हान', 'जॉर्ज ऑर्वेल : करून जावे असेही काही...' आणि 'कल्चर शॉक : आखाती देश' या चारही पुस्तकांचा आवाका मोठा आहे. तुमचा हा लेखनप्रवास नेमका कसा सुरू झाला आणि या प्रवासानं तुम्हाला काय शिकायला मिळालं?*

मुळात मी एक वाचक आणि साहित्याची विद्यार्थी आहे. साहित्याचा इतिहास, राजकारण, मानसशास्त्र अशा जीवनाला स्पर्श करणाऱ्या विविध विषयांशी संबंध येतो. इतिहास आणि काही प्रमाणात राज्यशास्त्र हेही माझ्या वाचनाचे विषय आहेत. आखातातल्या आणि आता अमेरिका-इराण युद्धामुळे माहीत झालेल्या बहारीन या लहानशा देशात मी राहू लागले, विद्यापीठात शिकवू लागले, तेव्हा मला वेगळ्या जगाची ओळख झाली. अरब जग हे अशांत असल्याने, गुंतागुंतीचं असल्याने आपण त्याच्याकडे फारसं लक्ष दिलेलं नाही. मीदेखील इथे येण्याआधी त्यावर फारसं वाचलेलं नव्हतं. कुतूहलापोटी मी ते समजून घेऊ लागले. त्यानंतर



विशाखा पाटील

असं लक्षात आलं, किंबहुना मला ते इथे राहताना दिसतही होतं, की पाश्चात्त्यांनी या जगाचा बारकाईनं अभ्यास केलाय आणि स्वत:च्या फायद्यासाठी त्याचा उपयोग करून घेतला आहे, घेतायेत. त्यांच्या धोरणांच्या बाबतीत टीका होऊ शकते, पण ते हे जग समजून घेतात हे मला महत्त्वाचं वाटलं. मला जे धागे समजले ते मी 'धागे अरब जगाचे' या पुस्तकात मांडले. या लेखनप्रवासानं मला आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ताणेबाणे लक्षात येत गेले. तो माझ्या अभ्यासाचाच विषय झाला.

*आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारणावर लिहिताना खूप पूर्वतयारी करावी लागते. शेकडो संदर्भ शोधावे लागतात. अरबस्तानाच्या ऐतिहासिक आढाव्यानंतर शतकभरापेक्षा मोठ्या काळाचा विस्तृत पण त्याच वेळी सखोल पट तुम्ही मांडला आहे. तुमच्या पुस्तकातून उमटणारं अरब जगाचं चित्र वाचकाचं आकलन अनेक परींनी वाढवतं. आजची परिस्थिती पाहता आपण योग्य वेळी योग्य मांडणी केली, याचे समाधान तुम्हाला लेखक म्हणून वाटतं आहे की पुन्हा काहीतरी सांगायला हवं, असं वाटतं आहे?*

अरब जगाच्या बाबतीत असं आहे की, इथे कधी काय होईल हे सांगता येत नाही. आपण बोलत असताना युद्ध सुरू आहे, इथली रोजची सकाळ आणि रात्रही वेगेवेगळी उगवतेय. या जगाचा दुसरा विशेष पैलू असा आहे की, इथे केवळ एका देशाला बघून चालत नाही. एकाचा संबंध दुसऱ्याशी, दुसऱ्याचा तिसऱ्याशी असा हा बुद्धिबळाच्या डावासारखा पट आहे. त्यामुळेच तुम्ही बघाल तर आपल्या सरकारलाही पश्चिम आशियातल्या देशांशी संबंध जोडून ठेवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. एकीकडे मला असा हा पट वाचकांपर्यंत पोहोचवला याचं समाधान आहे, पण सतत त्यात नवीन सांगण्यासारखंही आहे असं दिसतं. या पुस्तकाची दुसरी आवृत्ती आली तेव्हा आयसिसने धुमाकूळ घातला होता, त्यामुळे दुसऱ्या आवृत्तीत त्यावर एक प्रकरण आलं आहे.




अरब संस्कृती, तिथले कायदे
आणि जीवनप्रवासाचे बारकावे यांविषयी
वेधक माहिती सांगणारे पुस्तक...

## कल्चर शॉक

विशाखा पाटील

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ १००)

*‘धागे अरब जगाचे’ या पुस्तकात तुम्ही जी गुंतागुंत मांडली आहे; तिचे सामाजिक आणि राजकीय पदर समजून घेणं सुबुद्ध मराठी वाचकासाठी आजच्या काळात का महत्त्वाचं आहे, असं तुम्हाला वाटतं?*

हे पुस्तक मी लिहीत होते त्या वेळी म्हणजे २०१३/१४मध्ये या जगाविषयी आपल्याकडे फारशी उत्सुकता नव्हती. पण विशेष म्हणजे, १९८०/९०पासून लाखो भारतीय लिबियापासून आखाती देशांमध्ये काम करत होते. यात दक्षिण भारतीयांचं प्रमाण जास्त होतं. मराठी माणूस त्यात तुलनेनं मागे होता. हे जग आपण का समजून घ्यायला हवं? तर एक म्हणजे, आपण जागतिकीकरणाच्या युगात राहतो असं जेव्हा म्हणतो, तेव्हा आजूबाजूचं जग समजून घेणं भाग होतं. तिथे होणाऱ्या घडामोडींचा परिणाम आपल्या जीवनावर, आपल्या सरकारी धोरणांवरही होत असतो. त्यामुळे एक नागरिक म्हणून आपल्याला ते समजायला हवं. दुसरं, या जगाशी आपले संबंध पूर्वीपासूनचे आहेत. केवळ पाश्चात्त्यांच्या चश्म्यातून किंवा आपल्या इतिहासाच्या चश्म्यातून त्याकडे बघायला नको. आपण बदललो आहोत, तसे हे देशही बदलले आहेत, बदल घडतोय. तिसरं, यातल्या बऱ्याच देशांचा आणि आपला स्वातंत्र्यानंतरचा प्रवास एकाच वेळी सुरू झाला आहे. त्यामुळे ओघानंच त्यांच्या आणि आपल्या राजकीय, सामाजिक परिस्थितीची तुलना होते. प्रत्येक देशातल्या लोकांनी विशिष्ट मार्ग निवडलेला असतो, किंवा काही ठिकाणी त्यांना मार्ग निवडण्याची संधीही मिळत नाही. माझे एक इजिप्तमधले सहकारी होते. ते आपल्या – भारताच्या राज्यघटनेचं, लोकशाही व्यवस्थेचं सतत कौतुक करायचे. लोकशाही हे आपलं बलस्थान आहे. जागरूक नागरिक म्हणून आपण हा फरक समजून घ्यायला हवा.

*तुमचं पुढचं पुस्तक ‘सावध ऐका...’ यात तुम्ही चीन आणि पाकिस्तान यांच्या बहुपदरी आघाडीची सविस्तर, अन्वेषक चर्चा केली आहे. त्यातून भारतासमोरच्या*


अरब जग म्हणजे अमाप श्रीमंती अन् उन्मादी दहशतवाद.
समज अन् गैरसमजांच्या बुरख्यात दडलेलं
हे जग आहे तरी कसं? इतिहास, राजकारण,
समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण, लोकजीवन
अशा धाग्यांचा धांडोळा घेत वाळवंटातल्या
वेगवेगळ्या पाऊलखुणांचा हा अनोखा शोध...



धागे अरब जगाचे

विशाखा पाटील

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ १००)

*सगळ्यांत मोठ्या भू-राजकीय (Geo-political) संकटावर फार नेमका प्रकाश टाकला आहे. या युतीचं भारताच्या सार्वभौमत्वासमोरचं सर्वांत मोठं आव्हान आज तुम्ही कोणतं मानता? या पुस्तकाचं शीर्षक एका अर्थानं इशारा देणारं आहे. या शीर्षकाची आणि एकूण पुस्तकाची समकालीन प्रस्तुतता तुम्हाला काय वाटते?*

आपल्याला आपले शेजारी बदलता येणार नाहीत आणि त्यांच्याबरोबरच्या समस्याही सुटणाऱ्या नाहीत. चीन आणि पाकिस्तान या दोघांच्या मैत्रीचं कारण काय? तर तुमच्या लक्षात येईल, त्यांच्या मैत्रीचा मुख्य पाया भारतविरोध हाच आहे. ते वगळता तसं त्यांच्यात मैत्री होण्यासारखं पूर्वीही काही नव्हतं, वर्तमानातही काही नाही. उलट भारत आणि चीनचे पूर्वीपासून सांस्कृतिक संबंध होते. पण जेव्हा ते दोन देश अशा एकमेव अजेंड्यानं एकत्र येतात तेव्हा आपल्यासाठी आव्हान उभं राहतं, आणि पुढेही राहील. शिवाय चीन आता आर्थिक महासत्ता झालेला शेजारी आहे हे वास्तव आहे. त्यामुळे आपल्याला जास्तच सजग राहावं लागणार आहे. त्यासाठी आर्थिक प्रगतीला महत्त्व दिलं तरच आपण त्याला तोंड देऊ शकू.

*'कल्चर शॉक' अशी पुस्तकांची मालिकाच 'राजहंस'नं केली होती. या मालिकेतल्या आखाती देशांवरच्या तुमच्या पुस्तकाला अदृश्यपणे जाणवणारी तिथली राजकारणाची पार्श्वभूमी असली तरी भर आखाताच्या सामाजिक व सांस्कृतिक आकलनावरच आहे. हे पुस्तक फार रोचक, खूप नवीन माहिती देणारं असं झालं आहे. ते लिहिताना तुम्ही याची चौकट कशी आखलीत आणि कोणती माहिती दिलीच पाहिजे, अशी खूणगाठ लिहिताना मनाशी बांधली होतीत?*

या मालिकेची चौकट आखण्याचं श्रेय संपादक वैशाली करमरकर आणि प्रकाशक दिलीप माजगावकर यांच्याकडे जातं. त्या दोघांनी एका वाक्यात याची चौकट सांगितली होती, 'कामासाठी, शिक्षणासाठी, अगदी फिरण्यासाठी परदेशात जाताना गुगलवर जे मिळणार नाही असं आणि त्या-त्या देशाची संस्कृती, तिथल्या लोकांचे स्वभावविशेष




चीन आणि पाकिस्तान हे आपले सख्खे शेजारी देश.
त्यांच्या धोरणांचा व व्यूहरचनेचा दीर्घकालीन आढावा घेणारे,
भारतीयांना सावधानतेचा इशारा देणारे मौलिक पुस्तक...

सावध ऐका

विशाखा पाटील

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ १००)

समजावून सांगणारं छोटेखानी पुस्तक आपण करतोय.’ त्यातून हे प्रवासवर्णन किंवा केवळ अनुभवकथन नसेल, हे नक्की झालं होतं. खूणगाठ म्हणाल तर, आखाती अरब देशांची संस्कृती समजावून सांगणं, त्यासाठी आधी आपला चश्मा स्वच्छ पुसणं आणि प्रत्येक वाचकामध्ये आपण भारताचे सांस्कृतिक दूत आहोत आणि समोरच्यांची संस्कृती मोकळेपणे समजून घ्यायला हवी हा विचार रुजवणारं लेखन करणं एवढं ठरवलं होतं.

*याला जोडून म्हणजे, आजच्या जागतिकीकरणाच्या (Globalization) काळात माणसाची सांस्कृतिक ओळख आणि झरझर बदलत जाणारी मूल्यं याबद्दल तुमचं काय निरीक्षण आहे? आखात हाच केंद्रबिंदू मानून सांगितलंत तरी चालेल..*

सोविएत रशियाचं पतन आणि त्यापाठोपाठ जागतिकीकरण आलं तेव्हा ‘द एंड ऑफ हिस्ट्री’, ‘द वर्ल्ड इज फ्लॅट’ असं म्हटलं गेलं. जागतिकीकरणामुळे भौतिकतावाद वाढला, हे खरंय. त्यातून एका बाजूला प्रत्येक समूहात सांस्कृतिक घुसळण सुरू झाली, तर दुसरीकडे त्यातून एकमेकांशी टक्करही होऊ लागली. त्यातून आपली सांस्कृतिक ओळख मिटू नये यासाठी धडपड सुरू झाली. त्याचा परिणाम म्हणजे, अस्मिता जास्तच टोकदार होऊ लागल्या. आपली ओळख जतन करण्याच्या धडपडीत सांस्कृतिक परंपरेतलं काय धरून ठेवावं आणि काय सोडून द्यावं याचा गोंधळही उडताना दिसतो. वाढलेला भौतिकतावाद आणि सांस्कृतिक बाबतीत उडालेला गोंधळ सर्वच ठिकाणी दिसतो.

*एक अगदी वेगळा आणि वाचकांना खिळवून ठेवणारा तुमचा लेखनटप्पा म्हणजे ‘जॉर्ज ऑर्वेल’ यांच्यावरचं पुस्तक. ऑर्वेलची पुस्तकं आजही अधिक सुसंगत वाटतात. ‘ॲनिमल फार्म’ आणि ‘१९८४’ ही पुस्तकं सर्वांना माहीत आहेत. त्याहीपलीकडचा ऑर्वेल आहे. हा विषय तुम्हाला लेखक म्हणून सापडला कसा आणि तो तुम्ही इतक्या*

‘१९८४’ आणि ‘ॲनिमल फॉर्म’ या कलाकृतींनी
जागतिक साहित्यात मोहर उमटवणारा कादंबरीकार,
हुकूमशाही आणि साम्राज्यशाहीचा विरोधक, मानवतावादी
सैनिक ‘जॉर्ज ऑर्वेल’ याच्या आयुष्याची
व साहित्याची ही कहाणी...

जॉर्ज ऑर्वेल

विशाखा पाटील




किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ १००)

*रसाळ पुस्तकापर्यंत तडीस कसा नेलात?*

'राजहंस'चे लेखक असल्यानं तुम्हालाही हे ठाऊक आहे की, दिलीप माजगावकर आपल्याला आळस झटकायला लावतात. अर्थात, कधीतरीच आपण त्यांचं ऐकतो! ऑर्वेलची तुम्ही उल्लेख केलेली पुस्तकं आपल्याला माहीत असतात, पण त्याचे निबंधही तेवढेच महत्त्वाचे आहेत. एकदा त्यांच्याशी त्याविषयी बोलत असताना त्यांनी लगेच त्यावर कामाला लागायला सांगितलं. विषय त्यांच्या मनासारखा असला की ते अधूनमधून विचारणा करून लेखकाच्या कामावर लक्ष ठेवतात. लेखन अडल्यावर त्यावर मार्ग सुचवतात. ऑर्वेल एका विलक्षण काळात जगला आणि त्याचं व्यक्तिमत्त्वही विलक्षण होतं. एकदा मनासारखा विषय सापडला की आपण त्यात गुंतत जातो. त्यातून त्याचं जीवन आणि लेखन उलगडून दाखवणारं ते लेखन झालं.

*'राजहंस प्रकाशन' हे मराठीतील कसदार आणि वैचारिक साहित्यासाठी खासकरून ओळखलं जातं. तुमच्या या चारही महत्त्वाच्या पुस्तकांच्या निर्मितिप्रक्रियेत राजहंस प्रकाशनाची सोबत आणि अनुभव कसा राहिला?*

मुळात या प्रवासाला सुरुवात होणं हाच माझ्यासाठी महत्त्वाचा बिंदू आहे. अरब जगावर आपण लिहू शकतो असा थोडा आत्मविश्वास आल्यावर मी बहारीनला असल्यानं इंटरनेटवरून राजहंसचा ईमेल आयडी शोधला होता. पुस्तकाची रूपरेषा आणि २५ पानं मी ईमेलद्वारे पाठवली होती. उत्तर आलं तरी ठीक, नाही आलं तरी ठीक... दुसऱ्याच दिवशी प्रकाशक दिलीप माजगावकर आणि संपादक आनंद हर्डीकर यांनी पाठवलेलं सकारात्मक उत्तर हा माझ्यासाठी सुखद धक्का होता. दिलीप माजगावकर हे कामावर लक्ष ठेवून असतातच, हे मी सांगितलंच. माझ्या पुस्तकांसाठी मला वेगवेगळे संपादक लाभले. 'धागे अरब जगाचे' आणि 'ऑर्वेल' या पुस्तकांवर डॉ. सदानंद बोरसे, 'सावध ऐका..'वर आनंद हर्डीकर यांनी तर 'कल्चर शॉक'वर वैशाली करमरकर यांनी संपादकीय संस्कार केले. यांच्यामुळे मला योग्य ती भर घालता आली. उदाहरणार्थ, कल्चर शॉकची संहिता वाचून दिलीप माजगावकर आणि वैशाली करमरकर यांनी मला आखाती देशांमधल्या समाजसुधारकांबाबतचा प्रश्न विचारला. त्यातून मला त्या मुद्द्यावर लिहिता आलं. आणि बाकी बाबतीत म्हणाल तर राजहंसचं कार्यालय नसून ते एक कुटुंब आहे आणि या कुटुंबातली प्रत्येक व्यक्ती पुस्तकनिर्मितीचा प्रवास सुंदर करते. त्यातून उत्तम निर्मिती असलेलं पुस्तक वाचकांच्या हातात पडतं.

*आज डिजिटल युगात जगभरातील सगळी माहिती सहज उपलब्ध आहे; पण तिचं नेमकं विश्लेषण करणं कठीण झालं आहे. अशा वेळी जागतिक राजकारणाचा अभ्यास करून लिहिताना काय करायला हवं?*

हो, आता माहिती सहजपणे उपलब्ध आहे, एआयही ती आपल्याला चटकन

काढून देतं. पण जसं हिरोडोट्स इतिहासाच्या बाबतीत म्हणतो, इतिहास म्हणजे कथा नाही तर त्यात विश्लेषणही असतं. तेच जागतिक राजकारणाच्या बाबतीत म्हणता येईल. त्यासाठी मला वाटतं, सर्व बाजू समजून घेऊन विश्लेषण करायला हवं. काय घडतंय याबरोबरच ते का घडतंय, कोण घडवतंय आणि त्याचे परिणाम काय होणार आहेत हेही बघता यायला हवं.

*मराठी पुस्तकांच्या वाचकाचं प्रोफाईल गेल्या तीन-चार दशकांत झपाट्यानं बदलत आहे. रूढ अर्थानं ललित साहित्यात मोडणाऱ्या पुस्तकांपेक्षाही माहितीपर, नवीन ज्ञान देणारी, जगाचं आकलन वाढविणारी किंवा उत्तम कामं, व्यक्तींची ओळख करून देणारी पुस्तकं वाचकांना आवडतात. तुम्हाला वाचकांचा प्रतिसाद कसा मिळाला.. त्यातून तुम्ही पुढचं लेखन करताना काही खूणगाठी मनाशी बांधल्यात का?*

वाचकांचा कल बदलणं हादेखील जागतिकीकरणाचा परिणाम म्हणता येईल. जगाचं भान आल्यानं विविध विषयांशी संबंधित नॉन-फिक्शन आता जास्त वाचलं जातंय. इंटरनेटवर माहितीचा आता खूप साठा असला तरी वाचकांना वेगळे, ताजे विषय हवे असतात आणि त्याची मांडणी विश्लेषणात्मक हवी असते. 'धागे अरब जगाचे'चा विषय वेगळा असल्यानं त्यावर वाचक आजही प्रतिक्रिया कळवतात. तसंच ऑर्वेलच्या बाबतीतही दिसतं. उत्तम मिळालं तर ते वाचक वाचतात आणि आवर्जून कळवतातही. खूणगाठ म्हणाल तर, लेखनासाठी विषय निवडताना तो मला स्वत:ला वेगळा वाटतोय का हे पाहायचं आणि तो अवघड असला तरी वाचकांपर्यंत तो पोहोचण्यासाठी सुबोध पद्धतीनं मांडण्याचा प्रयत्न करायचा. आपल्याला त्यात आतून रस असायला हवा, त्यात आपण मनानं गुंतायला हवं, असं मला वाटतं.

*आपण म्हणताय ते अगदी खरंय. अशा अनवट वाटेवरच्या आणि वाचकांचे अनुभवविश्व समृद्ध करणाऱ्या लेखनकार्यासाठी आपल्याला शुभेच्छा. धन्यवाद.*


मराठी भाषेचा चारशे वर्षांच्या जडणघडणीचा साक्षेपी आढावा आणि मराठी प्रमाणलेखनाचा परामर्श घेणारा हा आहे मौलिक ग्रंथ. भाषेच्या उत्कर्षासाठी पायाभूत असा हा संदर्भग्रंथ व माहितीकोश सर्व थरांतल्या वाचकांना उपयुक्त ठरेल. तेव्हा सर्वांच्या संग्रही हवाच –




मागोवा

डॉ. नागेश अंकुश

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ १००)

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




सांदणवाट म्हणजे वेगळी वाट.
जीवनाची सुरुवात प्रतिकूल परिस्थितीत
होऊनही डॉ. पंडित विद्यासागर यांनी
नंतरच्या आयुष्यात जाणीवपूर्वक वेगळी वाट निवडली.
त्यांना आलेल्या अनुभवांचा लेखाजोखा मांडणारे
हे प्रेरणादायी आत्मकथन...

### सांदणवाट

डॉ. पंडित विद्यासागर

किंमत : ₹ ६००/- । (ट. ख. ₹ १००)

वास्तव, जादुई वास्तव आणि अतिवास्तवाच्या मिश्रणातून
आकारलेलं एक धूसर जग. आदिम वासना, भावकल्लोळ
व अवलिया पात्रांनी, तसंच प्रत्यक्ष आणि कल्पनेच्या
अजब सरमिसळीतून साकारलेली ही अनवट कादंबरी!

### खोटं खोटं पण खरं

रवीन्द्र लाखे

किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. ₹ १००)






व्यक्तिस्वातंत्र्य, इतिहास आणि बुद्धिप्रामाण्य
या तीन विषयांशी निगडित असलेले हे लेख.
भवताल आणि जगभरातलं राजकारण, समाजकारण
डोळसपणे समजून घेत मानवतेचं व परिपक्व -
संतुलित लोकशाहीचं स्वप्न पाहणाऱ्या
समाजशील व्यक्तीचं हे चिंतन...

### शहाणा असशील तर लिहू नकोस

लोकेश शेवडे

किंमत : ₹ ३४०/- । (ट.ख. ₹ १००)

## राजहंसी ग्रंथसृष्टी

लोकमान्य ते महात्मा (दोन खंड)

*राजकीय इतिहासचित्रणाचा एक नवा आदर्श निर्माण करणाऱ्या 'लोकमान्य ते महात्मा' या ग्रंथाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे ते बहुसंदर्भीय पद्धतीच्या मांडणीत. विचारी वाचकाला अंतर्मुख व्हायला लावणाऱ्या या मौलिक ग्रंथावरील दीपक बोरगावे यांचा हा आस्वादक लेख....*

डॉ. सदानंद मोरे लिखित 'लोकमान्य ते महात्मा' हा ग्रंथ दोन खंडांत विस्तारलेला असून १२४७ पानांचा आहे. याची संदर्भग्रंथ सूची आणि व्यक्तिनाम सूची ही ४२ पानांची आहे. यात व्यक्तिनाम सूची ही गोष्ट विशेष बाब आहे. या विशिष्ट कालखंडात विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांची नावे यात आली आहेत. हा ग्रंथ म्हणजे मराठी साहित्यातील एक चमत्कारच म्हणावा लागेल, असे मी म्हणतो आहे याचे कारण, गेल्या महिनाभरात मी तो बारकाईने वाचतो आहे.

विषयाची पकड, व्याप्ती, संशोधन, संशोधनात्मक दृष्टिकोन, कुठल्याही प्रकारच्या अभिनिवेशाची संपूर्णतः अनुपस्थिती, बहुआयामी संदर्भ, विषय मुळातच खूप कठीण आणि आव्हानात्मक, प्रसंगी आता या निरीक्षणाचे काय होईल असे वाटत असतानाच त्याचे अत्यंत योग्य अशा प्रकारचे संदर्भ देऊन ते संस्कृती-युद्ध लेखक शमवतात, म्हणून हा विषय इतका संवेदनक्षम आहे की, जणू काही आपण आता स्वातंत्र्ययुद्धात उतरलेले आहोत अशा प्रकारची वाचकाची परिस्थिती होते आणि असे असूनही अत्यंत जबाबदारीने केलेले बहुविद्याशाखीय विवेचन हे वाचकांना केवळ प्रबोधित न करता, विषयाची खोली आणि व्याप्ती ही किती बहुआयामी असू शकते हे दाखवून देते. हे या ग्रंथांचे एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल.

या विषयासाठी जे संशोधन आवश्यक होते, त्यासाठी एक मोठी संशोधकांची टीम तयार करायला हवी होती असे वाटत असतानाच, हे एकाच व्यक्तीने सर्व काही डोक्यावर घेऊन, पण अत्यंत संयमाने आणि तितक्याच ताकदीने या विषयाचे विवेचन डॉ. सदानंद मोरे यांनी केले आहे. लेखक कुठल्याही प्रकारच्या विचारप्रणालीचा पोज घेऊन, किंवा काही विद्वत्ताप्रचुर सांगत आहे अशा प्रकारची कोणतीही अभिनिवेशाची गोष्ट यात दिसत नाही. हेही या ग्रंथाचे वैशिष्ट्य वाटते. हे असे ग्रंथ मोठ्या आकाराचे

(या ग्रंथाची साईज ही ए-४ या पानाच्या आकारापेक्षा थोडी कमी असावी) असल्याने साधारणपणे गंभीर स्वरूपाचे वाचन करणारा वाचकदेखील या वाट्याला बहुधा जात नाही असे नेहमीचे चित्र आहे. काही आदरणीय अपवाद वगळता, हे पुस्तक फारसे... अगदी अभ्यासू वाचकांपर्यंतदेखील पोहोचलेले नाही, असे मला स्वत:ला वाटते (हे विधान कदाचित खोटे ठरले तर आनंदच आहे). याची कारणेही बरीच आहेत. त्याचा वेगळा विचार करावा लागेल. तो विषय इथे नाही.

भारताच्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या काही दशकांत आणि पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाले तोपर्यंतचा जो कालखंड आहे (हा जवळपास ८०-९० वर्षांचा कालखंड) या कालखंडाचा विचार प्रामुख्याने या ग्रंथाचा आहे. हे सर्व समजून घेण्याची ज्याला आस्था आहे, त्याबद्दल स्वारस्य आहे, तोच वाचक या फंदात पडेल. हे अर्थातच स्वाभाविक आहे. या ग्रंथात केवळ चरित्र, भारतीय आधुनिक राजकारण, स्वातंत्र्ययुद्धाच्या तारखा आणि घडलेल्या घटना किंवा इतिहास नाही किंवा गांधींचा विचार ज्याला आपण 'गांधीझम' म्हणतो किंवा लोकमान्य टिळकांचा तत्कालीन कालखंडातला विशेषत: राजकीय विचार हाच केवळ या ग्रंथाचा विषय नाही. हे मुद्दामहून नमूद करायला हवे. किंबहुना, यात लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी हेच या ग्रंथाचे विषयही नाहीत, असेही विधान या ग्रंथाबाबत करता येते. या कालखंडात हे भारतातील दोन महामानव हेच सर्व देशात भारताचे नेते म्हणून का ठरले असावेत? याची मीमांसा या ग्रंथात इतक्या तर्कशुद्ध पद्धतीने आली आहे, की तुम्हाला त्याबद्दल कोणताच वाद घालता येत नाही.

अजून एक या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे, तुम्ही या ग्रंथातील कोणताही तुकडा काढून वाचायला सुरू करू शकता. त्यासाठी सुरुवातीपासून शेवटपर्यंत असा काही वाचनक्रम अवलंबण्याची तुम्हाला गरज नाही, असे मला स्वत:ला जाणवले. माझे असेच या ग्रंथांचे वाचन झाले आहे.

हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून याबद्दलची चर्चा मी ऐकत होतो. त्याबद्दल लिहून आलेले वाचतही होतो. पण प्रत्यक्ष या ग्रंथाला गेल्या महिन्यापासून स्पर्श झाला आणि एकूणच भारतीय स्वातंत्र्य युद्धातील कोलाहल आणि नेमक्या गोष्टी कशा घडत गेल्या, त्याला जबाबदार असणारे अनेक घटक कसे कार्यरत होत गेले, त्यांची नेमकी कारणे कोणती होती हे समजत गेले. साहित्य, संगीत, क्रीडा, तत्त्वज्ञान नाटक, इतिहास लेखन, धर्म, हिंदुत्ववादी आणि मुस्लीम विचारधारा, आरएसएस, कम्युनिस्ट, समाजवादी आणि या काळात कार्यरत असलेल्या विविध विचारधारा, प्रत्यक्ष लोकांच्या गाठीभेटी, चळवळी. दंगली, नेत्यांची अटकसत्रे, ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून, पत्रे, टेलिग्राम्स, लिहिली गेलेली अनेक चरित्रे, मुलाखती, बातम्या, न्यायालयात झालेल्या जबान्या, वृत्तपत्रीय लेखन, त्या त्या विशिष्ट व्यक्तींवर झालेल्या घटनांचा तात्त्विक, मनोवैज्ञानिक आणि वेगवेगळ्या अनुषंगाने घेतला गेलेला घेतलेला ठाव, तुलना, इतर

सामाजिक शास्त्रांचा आधार आणि या सर्वांचीच एकूण परिमिती या राजकारणावर कशी होत गेली याचे एक अफाट आकलन हा ग्रंथ देतो. वाचकांना गेल्या दीडशे वर्षांतील भारताच्या इतिहासाबद्दल एक नवी आकलनाची दृष्टी आणि खोली हा ग्रंथ देतो. या कालखंडातल्या आपल्या 'आजपर्यंतच्या समजाला' हा ग्रंथ फाटा देतो. प्रसंगी धक्केही देतो.

आपल्या भारतीय आधुनिक इतिहासाचा हा दस्तावेज आपली राजकीय आणि सांस्कृतिक जाणीव नक्कीच समृद्ध करतो. वाचकांच्या मनात अनेक शंका, प्रश्न आणि नवीन आव्हाने उभे करतो. म्हणूनच ज्येष्ठ विचारवंत आणि संपादक कुमार केतकर यांनी या ग्रंथाला केवळ प्रबोधनात्मक ग्रंथ न म्हणता, वाचकाला अंतर्मुख व्हायला लावणारा ग्रंथ असे म्हटले आहे. प्रसिद्ध लेखक आणि संपादक दिलीप माजगावकर यांनी या ग्रंथाला ग्रीक शोकांतिकेची आठवण करून देणारा ग्रंथ असे म्हटले आहे. डॉ. सदानंद मोरे यांना या अशा अफाट ग्रंथासाठी केवळ धन्यवाद देऊन चालणार नाही, तर त्यांना केवळ सलामच करावा लागेल. या ग्रंथाचे संपूर्ण वाचन झाल्यावर यावर अर्थातच काहीतरी दीर्घ लिहिण्याचा मी विचार करतो आहे. बघू या. जमले तर नक्कीच.

**दीपक बोरगावे**
मुंबई.



## साहित्य अकादमीप्राप्त 'राजहंसी' साहित्यकृती



सुबोध बायबलचे हे ललितरम्य शैलीतील
मराठी भाषांतर मराठीतील धार्मिक साहित्य-दालन
समृद्ध करणारे... जरूर वाचा –

### सुबोध बायबल
### (जुना व नवा करार)

फादर फ्रान्सिस दिब्रेटो

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ १५००/- । (ट.ख. ₹ १००)

मर्यादित गुंतवणूक, व्यावसायिक व्यवस्थापन, गतिशील
निर्णयप्रक्रिया, अनोखी कार्यपद्धती आणि प्रामाणिकता
यांच्या संयोगातून वास्तवात उतरलेले स्वप्न म्हणजे ब्राह्मोस!
या प्रकल्पाच्या निर्माणकर्त्यांने सांगितलेली
ही वेधक तितकीच प्रेरक जन्मकथा...




### ब्राह्मोस

ए. शिवतनू पिल्लई
अनुवाद : अभय सदावर्ते

किंमत : ₹ ३७५/- । (ट.ख. ₹ १००)




हे केवळ एका चित्रकाराचे आत्मकथन नाही,
तर हा समाजातील एका वंचित वर्गाचा
अस्वस्थ करणारा उद्‌गार आहे. व्यक्तिचित्रणाच्या
अंगाने जाणाऱ्या आत्मकथनातून
अंतर्मुख करणारा अस्सल वाचनानुभव...

### काळ्यानिळ्या रेषा

राजू बाविस्कर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ६९०/- । (ट.ख. ₹ १००)

# आम्हां असे अभिमान

## साहित्यक्षेत्रातील सन्मानाच्या ‘साहित्य अकादमी पुरस्कार’प्राप्त ‘राजहंसी’ साहित्यकृतींचा जागर...

*सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या ‘सुबोध बायबल’ (जुना व नवा करार) या मराठी अनुवादित साहित्यकृतीस सन २०१३मध्ये ‘साहित्य अकादमी पुरस्कार’ प्राप्त झाला. सन २०१०मध्ये राजहंस प्रकाशनाने ही साहित्यकृती प्रकाशित केली आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेचा संपादित अंश येथे दिला आहे.*

## सुबोध बायबल (जुना व नवा करार)

चार शुभवर्तमाने, प्रेषितांची कामगिरी, प्रेषितांनी लिहिलेली पत्रे आणि प्रकटीकरण ही सर्व स्वतंत्र पुस्तके समजली जातात. ती मिळून नव्या कराराची एकूण सत्तावीस पुस्तके होतात. पहिल्या चार शुभवर्तमानांचे लेखन मॅथ्यू, मार्क, लूक आणि जॉन ह्यांनी केले आहे.

प्रभू येशूने काहीही लिहून ठेवले नाही. त्याने तोंडी उपदेश केला. त्याच्या मृत्यूनंतर त्याची शिकवण मौखिक स्वरूपात (Oral tradition) लोकांपुढे आली. वर्षामागून वर्षे सरू लागली. ज्यांनी ख्रिस्ताला प्रत्यक्ष पाहिले होते, त्याची प्रवचने ऐकली होती आणि त्याची शिकवण मुखोद्‌गत केली होती, ते लोक एकामागून एक काळाच्या पडद्याआड जाऊ लागले. त्यामुळे ही शिकवण लिखित स्वरूपात कायम करावी, असा आग्रह श्रद्धावान लोकांनी धरला. त्यानुसार जाणत्या लोकांनी ख्रिस्ताच्या आठवणी आणि वचने लिहून काढण्यास सुरुवात केली.

हे सर्व लेखन स्फुट आणि फुटकळ स्वरूपात होते. ख्रिस्ताचा शिष्य संत मॅथ्यू ह्याने ही सर्व उपलब्ध साधने गोळा केली आणि सर्व मजकूर अरेमाईक भाषेत एकत्र ग्रथित केला. त्या पुस्तकाला ‘अरेमाईक मॅथ्यू’ असे नाव पडले. पुढे त्याच्या पुस्तकात जी माहिती अंतर्भूत नव्हती, तिचा एक स्वतंत्र ‘पुरवणीसंग्रह’ तयार झाला.

‘अरेमाईक मॅथ्यू’ व ‘पुरवणीसंग्रह’ या दोन्ही पुस्तकांचे ग्रीक भाषेत भाषांतर झाले. पिटर हा येशूचा अग्रशिष्य होता. संत मार्क हा त्याचा लेखनिक होता. संत पिटरने प्रवचनांतून दिलेली माहिती एकत्रित करून आणि जरूर तिथे ‘अरेमाईक

मॅथ्यू' आणि 'पुरवणीसंग्रह' यांतील उचित मजकुराची पुनरुक्ती करून घेऊन संत मार्कने आपले शुभवर्तमान रचले. ते संक्षिप्त आणि सुटसुटीत आहे. येशूचे सार्वजनिक कार्य, त्याचे क्लेश, मरण आणि त्याची मोजकी वचने यांचा समावेश मार्कने आपल्या शुभवर्तमानामध्ये केला आहे.

त्यानंतर एका अनामिक संपादकाने संत मार्कचा मूळ आराखडा आधारभूत मानून ग्रीक भाषेत ग्रंथ रचला. त्याने 'अरेमाईक मॅथ्यू' आणि 'पुरवणीसंग्रह' यांतील पुष्कळशा मजकुराची पुनरुक्ती केली. शिवाय येशूच्या बालपणाविषयीचे दोन अध्याय त्याला जोडले. तसेच त्याने इतरत्र नसलेली येशूची काही वचने मिळवून आपल्या ग्रंथात त्यांचा अंतर्भाव केला. सध्या आपल्या हाती असलेले हेच ते 'संत मॅथ्यूलिखित शुभवर्तमान' होय.

संत मॅथ्यूने संत मार्ककडून मूळ आराखडा घेतल्यामुळे, तसेच 'अरेमाईक मॅथ्यू' व 'पुरवणीसंग्रह' यांच्यातून मजकूर घेतल्यामुळे (संत मार्कनेही तिथून काही मजकूर घेतला आहे, परंतु तो संक्षिप्त रूपात आहे.) दोघांच्या पुस्तकांत खूप साम्य आढळते. मात्र, संत मार्कला संत पिटरच्या तोंडून विश्वासार्ह व अधिकृत माहिती मिळत गेल्यामुळे संत मार्कचे शुभवर्तमान अधिक प्रत्ययकारी आणि जिवंत वाटते. नवा करार हाती पडताच प्रथम संत मार्कचे शुभवर्तमान वाचावे.

संत लूकनेही संत मार्कचा मूळ आराखडा स्वीकारला. त्याचा वाचकवर्ग बिगरज्यू होता. त्यांच्या गरजेइतका मजकूर त्याने स्फुट लेखनातून घेतला. तसेच 'पुरवणीसंग्रहातून' त्याने फार मोठा भाग (अध्याय ९:५१ ते १८:३.) उद्धृत केला आहे. त्याचबरोबर संत लूकने स्वतंत्रपणे संशोधन करून जमवलेल्या मजकुराचा समावेश आपल्या ग्रंथात केला आहे. (लूक १:१-३.) उदाहरणार्थ, येशूचे बालपण, उत्तम सॅमॅरिटनची कथा, मार्था आणि मेरी यांच्या घरी घडलेल्या घटना, तसेच उधळा पुत्र,





हा शोधप्रवास आहे - मानवी संस्कृतीतील तत्त्वज्ञानाची वाट अविरतपणे चालणाऱ्या आणि ही वाट उजळून टाकणाऱ्या तत्त्वज्ञांचा तसेच विश्वाची, निसर्गाची, मानवी मनाची रहस्ये शोधण्यासाठी त्यांनी केलेल्या अविश्रांत धडपडीचा...
या साऱ्यांचा हा वेधक धांडोळा.

विवेकयात्री

डॉ. अभिजित वैद्य

किंमत : ₹ ११००/- । (ट.ख. ₹ १५०)

फॅरिसी व पापी मनुष्य यांचे दृष्टान्त, इत्यादी.

संत लूक हा व्यवसायाने वैद्य होता, तसाच तो एक संवेदनशील लेखक आणि कुशल संपादक होता. 'सौंदर्य सारे रचनेत असते' या उक्तीनुसार त्याने मजकुराची सुसंगत मांडणी करून या ग्रंथाची निर्मिती केली आहे. तो स्वभावाने सहिष्णू होता. समाजातील दुर्बल घटकांबद्दल त्याला कमालीची कणव वाटत होती. त्याने स्त्रियांना इतके झुकते माप दिले आहे की, 'स्त्री-स्वातंत्र्याचा आद्य पुरस्कर्ता' म्हणून त्याची नोंद व्हावी. त्याच्या लेखनात उच्च साहित्यगुण आढळतात म्हणून इटालियन कवी डान्टे (इ. स. १२६५-१३२१) ह्याने 'ख्रिस्ताच्या करुणेचा निष्ठावंत साक्षीदार' (Scriba Mans}tudinis Christi) अशा (लॅटिन) शब्दांत त्याचा गौरव केला आहे.

येशूच्या कार्यासंबंधीचे फुटकळ लेखन, 'अरेमाईक मॅथ्यू' आणि 'पुरवणीसंग्रह' ही आधारभूत असलेली पुस्तके साधारण इसवी सन ४०-५०मध्ये ग्रथित झालेली असावीत.

'प्रेषितांची कामगिरी' या पुस्तकात विशेषत: पिटर आणि पॉल यांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. त्यानंतर पॉलने लिहिलेली व त्याच्या नावावर असलेली तेरा पत्रे, अन्य शिष्यांनी लिहिलेली आठ पत्रे ह्यांचा समावेश नव्या करारात होतो. 'जॉनला झालेले प्रकटीकरण' ह्या पुस्तकाने नव्या कराराचा समारोप झाला आहे.

मॅथ्यू, मार्क, लूक आणि जॉन ह्यांच्यासाठी चार प्रतीके वापरली जातात. मॅथ्यूने आपल्या शुभवर्तमानाची सुरुवात येशूच्या वंशावळीने केली, त्याने येशूच्या मानवीपणाचा शोध घेतला म्हणून माणसाचे मुख हे त्याचे प्रतीक आहे. 'अरण्यात वाणी झाली आहे,' असे शब्द मार्कच्या शुभवर्तमानात प्रारंभी येतात म्हणून सिंहमुख हे त्याचे प्रतीक आहे. झेकरायह हा याजक मंदिरात असताना त्याला देवदूताचे दर्शन झाले. मंदिरात बळी अर्पण केले जातात म्हणून वृषभ-मुख हे लूकचे प्रतीक आहे. जॉन स्वभावाने ध्यानस्थ वृत्तीचा होता. त्याच्यासाठी गरुड हे प्रतीक वापरले जाते. गरुडाचे परिप्रेक्ष्य व्यापक असते, त्याची नजर भेदक असते, तो पक्षी मर्माचा अचूक वेध घेत असतो. जॉनकडे अशीच दृष्टी होती. त्याने घेतलेला येशूच्या जीवनाचा शोध मर्मग्राही आहे. मॅथ्यूने येशूच्या कुळाचे मूळ आब्राहामपर्यंत, लूकने ॲडमपर्यंत, तर जॉनने ते नामरूपाच्या पलीकडे असलेल्या देवापर्यंत नेले आहे. देव चित्स्वरूप, तर येशू हा त्याचा सनातन शब्द आहे, असे त्याने लेखनारंभी म्हटले आहे.

### तीन टप्पे

नव्या करारातील पहिल्या चार पुस्तकांना शुभवर्तमान म्हणतात. शुभवर्तमानासाठी ग्रीकमध्ये 'एवांगेलिऑन' (Evangelion) आणि इंग्रजीत 'गॉस्पल' (Gospel) हे शब्द वापरले जातात. 'गॉड-स्पेल' या जुन्या इंग्रजी शब्दावरून गॉस्पल शब्द तयार

झाला आहे. त्याचा अर्थ शुभवार्ता. मराठीत आपण शुभवर्तमान किंवा सुवार्ता हा शब्द वापरतो. प्रभू येशू आणि त्याचे शिष्य यांनी केलेला उपदेश व दिलेली शिकवण म्हणजे शुभवर्तमान होय.

मौखिक शिकवणीपासून लिखित संहितेपर्यंतचा शुभवर्तमानाचा प्रवास गुंतागुंतीचा आहे. येशूच्या शिकवणीचा काळ साधारणत: इसवी सन ३० ते ३३ असा तीन वर्षांचा होता. त्यानंतर दोन पिढ्या येशूची शिकवण मौखिक स्वरूपात दिली गेली. तिला ग्रंथरूप दिले गेले नव्हते. ती प्रक्रिया इसवी सन ६५च्या दरम्यान सुरू झाली आणि इसवी सन १००पर्यंत पूर्णत्वास गेली. ही प्रक्रिया तीन टप्प्यांत घडली.


माणूस, निसर्ग, शाळा, पाखरांसारखी मुलं आणि आई
हे एकनाथ आव्हाड यांचं भावजीवन.
या कवितांमधून आपणास ऐकू येईल
विशुद्ध आत्मस्वर आणि जाणवेल आशावाद.
समृद्ध होत जाईल आपलं जीवन!
‘संग्रही हवाच!’ असा कवितासंग्रह...



जगणं होईल हिरवंगार

एकनाथ आव्हाड

किंमत : ₹ १६०/- । (ट.ख. ₹ १००)



शिवाजी महाराजांसंबंधीच्या असंख्य कथांचे, व्यथांचे
हे अनोखे संकलन म्हणजे इतिहास, चित्रकला
आणि शिल्पकला क्षेत्रांतील मान्यवरांच्या
कार्यकर्तृत्वाला दिलेली मानवंदनाच आहे!

कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या

सुहास बहुळकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १०००/-
सवलतीत : ₹ ७५० । (ट.ख. ₹ १५०)

# असे जन्मले पुस्तक

## चंद्रावती रामायण

**चंद्रावती आणि मी !**

तेव्हा मी बांग्लातून मराठीत कवितांचे अनुवाद करत सुटले होते. छंदच झाला होता. रोज एक. कधी दोन दिवसांत एखादी. शिवाय बांग्ला पुस्तकं वाचत होते. म्हणजे कधी काळी, जेव्हा लिपी वाचता येत नव्हती तेव्हा जे मराठी अनुवाद वाचले तेच मूळ लेखन वाचायच्या उत्सुकतेनं वाचत होते. अर्थातच मूळ कलाकृती काकणभर सरस असतेच. त्या वेळी डॉ. अरुणा ढेरे 'मध्ययुगीन भारतीय कवयित्रींचा' प्रकल्प करत होत्या. त्यांचं काम तेव्हा सुरू होतं. एकदा त्या मला म्हणाल्या, 'ही चंद्रावती तुझ्या ओळखीची आहे का?' तेव्हा मी प्रथम तिचं नाव ऐकलं. किती सुंदर नाव आहे! मनात पहिली प्रतिक्रिया उमटली. इतक्या सुंदर नावाच्या स्त्रीने कवयित्रीच असायला हवं आहे. मालव्यात 'चंद्रसखी' आहे तशी. तेव्हा मी चंद्रावती वाचायला घेतली. आधी पुस्तक मागवलं. डॉ. दिनेशचंद्र सेन यांचं. मैमनसिंह गीतिका. यात तिच्या गीतिका होत्या. शिवाय तिच्यावर रचलेली एक गीतिकादेखील होती.

सुप्रसिद्ध बांग्ला लेखिका कवयित्री डॉ. नवनीता देव सेन यांनी तिच्यावर एक लेख लिहिला होता. तो तेव्हा फक्त आधाराला होता. पुढे पुस्तकांतून ती जास्त भेटत गेली. मूळ बांग्ला पुस्तकातली माहिती मी मराठीतून अरुणाताईंना दिली. त्या इतके दिवस माझं नुसतं भिरभिरणं बघत होत्या. आज हा कवी, उद्या तो. एकदोनदा त्यांनी मला त्यांच्या सौम्य पद्धतीने रागावलंही होतं. 'नुसती गंमत चालली असते तुझी. एका जागी बैठक मारून बस आणि काहीतरी कर. ही चंद्रावतीच पूर्ण कर.'




मी घाबरले. कारण चंद्रावती म्हणजे केवळ तिचं अपूर्ण रामायण एवढीच नव्हती. क्षितीशचंद्र मौलिकांनी त्या

रामायणाचा उत्तरार्ध शोधला होता. चंद्रावतीच्या स्वत:च्या इतर दोन रचना होत्या- मलुया सुंदरी आणि दस्यू केनाराम. याखेरीज चंद्रावतीच्या शंभर वर्षांनंतर नयनचांद घोष यांनी लिहिलेली 'चंद्रावती' या नावाची गीतिकादेखील होती. म्हणजे सुमारे पाच रचना होत्या. सर्वांत आधी मनात प्रश्न निर्माण झाला, 'जमेल न मला?' मी तो त्यांना विचारला. तर त्या म्हणाल्या, 'हो, जमेलच.'

जेव्हा आपला आपल्यावरच विश्वास नसतो तेव्हा कुणीतरी तो दाखवला की बरं वाटतं. त्याच उत्तराचं बोट धरून मी पूर्व बंगालच्या निबिड, नदीमातृक प्रदेशात प्रवेश केला आणि मग मागे वळून पाहायला वेळच मिळाला नाही. कितीतरी शक्यता दिसल्या. एक तर मध्ययुगीन भारत. त्यात आपलाच अखंड देश. तिथली भाषा, भौगोलिक परिस्थिती, सामाजिक राजकीय स्थिती यांवर जे जे उपलब्ध होतं ते ते मिळवून वाचत गेले. पण ऑनलाईन पुस्तकं मागवायला मर्यादा ही असते की तुम्हाला दुकानात किंवा प्रदर्शनात जसा निवांत वेळ मिळतो तसा तिथे मिळत नाही. मग त्यासाठी खास कोलकात्याला जाऊन आले. कॉलेज स्ट्रीटवरची दुकानं पालथी घातली. मिळतील ती पुस्तकं घेऊन आले. खूप आनंद झाला.




सईंनी आपल्या भ्रमंतीच्या अन् स्वप्नरंजनाच्या विविध
आविष्कारांना शब्दबद्ध करून साकारलेलं
हे कोलाज म्हणजे -

**सयसंगत**

सई परांजपे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ १००)

भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना, आजवरचा प्रवास,
भूमिका आणि कार्यपद्धती, भारतासारख्या खंडप्राय विशाल
देशाच्या वाटचालीत असलेला महत्त्वपूर्ण सहभाग यांचा
रोचक इतिहास, तोही अत्यंत रंजक पद्धतीने...

**गोष्ट रिझर्व्ह बँकेची**

विद्याधर अनास्कर



आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ १००)

माझी तिथली मैत्रीण पियाली बॅनर्जी. तिनं मला तिथल्या प्रसिद्ध पुस्तक प्रदर्शनातून पुस्तकं पाठवली कारण तिथं स्वतंत्र बांगलादेशी स्टॉल्स असत. मधल्या राजकीय घडामोडीत आता ते बंद झालंय इतक्यात.

मग कोविडची संचारबंदी आली. माझ्याजवळ होतं त्या मर्यादित साहित्यात मी काम सुरू ठेवलं. तेव्हाच्या परिस्थितीत काम करत राहणं हा एकच मार्ग होता की ज्यानं ताण कमी होईल कारण भोवतालची स्थिती खूप विषण्ण करणारी होती. मात्र मी वर्तमानात कमी आणि मनाने मध्ययुगात जास्त वावरत होते. ते घनदाट अरण्य, साप विंचवांनी युक्त मात्र त्याहून जास्त दरोडेखोरांच्या हिंसेनं जास्त. खळाळून वाहणाऱ्या नद्या, तिथला समुद्र, तिथली दलदल, येणारे पूर.....! कधी कधी गाढ निजेत मला ती दृश्यं दिसत. पायांना गवताचा स्पर्श जाणवे. तिथं एकदा जाऊन यावं का? असा विचार मनात सारखा येऊन लागला. दोनदा तशी तयारीही झाली. मात्र दोन्ही वेळा बांगलादेशातल्या राजकीय आणि सामाजिक उलथापालथीत तिथं जाणं सुरक्षेच्या दृष्टीनं सोयीचं नव्हतं त्यामुळे राहिलं.

कोविडनंतर सगळं जेव्हा पूर्ववत होऊ लागलं तेव्हा इतर जबाबदाऱ्याही वाढल्या. वेळा बदलल्या. मात्र चंद्रावतीनं हात सोडला नाही.

चंद्रावतीचं रामायण (अपूर्ण) मध्ययुगीन पयार छंदात आहे. ते मराठीत मला साध्या अष्टाक्षरी छंदात सहज सुचत गेलं. जेव्हा तिच्या रचनेचा घाट बदलला तिथे एखाद्‌दुसऱ्या कडव्यासाठी मीही बांधणी बदलून पाहिली. विशेषत: बारोमासी लिहिताना. मात्र आता त्यावरचे अभिप्राय वाचते, ऐकते तेव्हा खूप समाधान वाटतं.

चंद्रावती रामायण पुस्तकात रामायण (अपूर्ण), संयोजन (उत्तरार्ध), दस्यू केनाराम, मलुया सुंदरी, चंद्रावती या पाच रचनांचे मराठी अनुवाद. मध्ययुगीन काव्य छंद, गीतिका, पालागान, बरोमासी या संकल्पनांवर सविस्तर लेखन तसेच कृत्तिवास, जगद्रामी रामायण, विष्णुपुरी रामायण आणि बंगालातली लोक रामायणे यांवर सविस्तर लेखनही समाविष्ट आहे.



सुमारे साडेतीन वर्षं केलेल्या या कामाचं पुस्तकरूप जेव्हा मी पाहिलं तेव्हा मला खूप भरून आलं. आपल्या पहिल्या पुस्तकावर राजहंसची निळी मुद्रा उमटावी याहून आनंदाची गोष्ट दुसरी कोणती असेल? नाही का!

**डॉ. माधवी भट**
९७३०४५९४५५

# क... कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## मी आणि ती

मी गजबजलेलं गाव
ती नागमोडी वाट,
मी विशाल समुद्र
ती उसळणारी लाट.

मी तळपणारा सूर्य
ती तेजोमय प्रकाश,
मी चमकणारा तारा
ती निळे आकाश.

मी मान्सून इंद्रधनुष्य
ती मनमोहक सप्तरंग,
मी कोसळणारा धबधबा
ती फेसाळ जलतरंग.

मी भरीव वृक्ष
ती फुलाचे पान,
मी घनदाट जंगल
ती हिरवेगार रान.

मी रिमझिम पाऊस
ती जोरदार वादळ,
मी स्थिर तलाव
ती तरंगणार कमळ.

मी टोकदार दगड
ती लालसर माती,
मी जुना ऋणानुबंध
ती टिकवते नाती.

**भूषण सहदेव तांबे,** मुंबई

# राजहंसी पार

काय घडलं 'राजहंसी' नगरीत?

## जगणं होईल हिरवंगार : काव्यसंग्रह प्रकाशन कार्यक्रम
## दि. ३ ऑगस्ट २०२६

बालसाहित्याची चाळीस पुस्तके लिहिणारे आणि साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार लाभलेले एकनाथ आव्हाड यांनी आपल्या साहित्यसेवेचा ओढा आता प्रौढांच्या साहित्याकडे वळवला आहे. ''राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेला 'जगणं होईल हिरवंगार' या पहिल्याच कवितासंग्रहातून आपली ठसठशीत नाममुद्रा त्यांनी उमटवली आहे.'' असे उद्गार ज्येष्ठ समीक्षक प्रा. विश्वास वसेकर यांनी काढले. 'जगणं होईल हिरवंगार' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ प्रकाशक सुनीताराजे पवार होत्या.

वसेकर पुढे म्हणाले की, 'आव्हाडांमधला संवेदनशील शिक्षक त्यांच्या कवितेतून डोकावतो. 'सविता पटेकर.. सतत गैरहजर' ही त्यांची कविता कुसुमाग्रजांचा 'कणा' कवितेसारखी अजरामर ठरणार आहे.'

डॉ. प्रिया निघोजकर यांनी संग्रहाची विस्तृत आणि सोदाहरण समीक्षा केली. त्या म्हणाल्या की, 'आव्हाड यांची समत्व दृष्टी, आशावादी वृत्ती आणि त्यांच्या ठायी




सुनीताराजे पवार, प्रा. विश्वास वसेकर, एकनाथ आव्हाड, डॉ. प्रिया निघोजकर

असलेलं समग्रतेचं भान ठेवत त्यांनी सामाजिक आशय आपल्या काव्यातून व्यक्त केला आहे. आव्हाड दृश्यापलीकडचं वास्तव कवेत घेतात आणि तेच कवितारूप होऊन अवतरतं.

मराठी काव्यपरंपरेत सामाजिक भान आणि व्यक्तीच्या आंतरिक भावविश्वाची कोमलता यांचा असा अद्भुत संगम आपल्याला क्वचितच अनुभवायला मिळतो.’

कवी एकनाथ आव्हाड यांनी आपल्या एकूण लेखनप्रवासाचे विवेचन केले. अध्यक्षीय भाषणात सुनीताराजे पवार म्हणाल्या की, ‘आव्हाडांच्या साहित्यात सहजगत्या मुलं आणि मूल्यं डोकावत असतात.’

या कार्यक्रमास माधव गोखले, पत्रकार विजय लेले, चित्रकार शरद प्रभुदेसाई, कि. स. पवार, मेधा रानडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

---

## कथा चाळिशी, गवसलेल्या गोष्टी : पुस्तक प्रकाशन
## दि. ६ ऑगस्ट २०२६




डावीकडून : डॉ. चंद्रशेखर फणसळकर, श्रीकांत कुलकर्णी, राजीव नाईक, डॉ. मोहन आगाशे, वंदना बोकील-कुलकर्णी, राजेश देशमुख

## प्रतिभावंतांची मांदियाळी : पुस्तक प्रकाशन, दि. ८ ऑगस्ट २०२६




'प्रतिभावंतांची मांदियाळी' या पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर....

'आपले संपूर्ण जीवन शैक्षणिक कार्याला वाहून ऋषितुल्य जीवन जगणारे प्रा. पंढरीनाथ मांडवगणे यांच्या उज्ज्वल परंपरा लाभलेल्या त्यांच्या कुटुंबात नेहमीच थोर व्यक्तींचा, सारस्वतांचा राबता असे, याची फलश्रुती म्हणजेच त्यांचे सर्वसुखसंपन्न आयुष्य होय.' असे प्रतिपादन ज्येष्ठ धन्वंतरी डॉ. नानासाहेब चौधरी यांनी पुस्तक प्रकाशन प्रसंगी केले. या सोहळ्यास साहित्यिक डॉ. श्रीकांत तिडके, आ. रणधीर सावरकर, अकोला एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. गिरीश देशपांडे, विदर्भ साहित्य संघ-अकोला शाखेचे अध्यक्ष विजय कौसल, पद्मा मांडवगणे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

---

## कॅडबरी : पुस्तक प्रकाशन. दि. १० ऑगस्ट २०२६




'कॅडबरी' या पुस्तक प्रकाशनप्रसंगी राजहंसचे संपादक शिरीष सहस्रबुद्धे यांसह उपस्थित मान्यवर...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

### निवळशंख पाणी

आपल्याला आलेले अनुभव, आपल्या आठवणी, आपल्या मनातले विचार ज्याला स्पष्टपणे, निखळपणे मांडता येतात तो लिहिणाराच वाचकांच्या अपेक्षेला उतरतो. आठवणी लिहिताना त्या वेळेची परिस्थिती आणि त्या परिस्थितीला अनुसरून असलेली मन:स्थिती तंतोतंत उतरली तरच त्या लिखाणाला शब्दसौंदर्य लाभते. यासाठी विचारांना कल्पनाशक्तीचे सामर्थ्यही लाभावे लागते.

आपल्या आयुष्यात आलेल्या विविध आठवणी आणि अनुभवांवर बेतलेल्या आठ ललित लेखांचा समावेश असलेले हे पुस्तक म्हणजे अलीकडच्या काळातील एक अप्रतिम असे ललित साहित्य आहे. यातील सर्वच लेख यापूर्वी हंस, मौज, सृजनसंवाद अशा दिवाळी अंकांतून प्रसिद्ध झालेले आहेत.

हे सारे लेख मी यापूर्वी वाचलेले असूनही पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटतात. या पुस्तकातील 'समुद्रावरून आलेला पाऊस', या शीर्षकाचा जो ललित लेख आहे, तो गोव्याच्या लोकमत दिवाळी अंकातील असल्यामुळे तो माझ्या वाचनात पूर्वी आला नव्हता. डॉ. रेवा दुभाषी यांच्या ललितलेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे, त्यांची ललितलेखांच्या शीर्षकांची आकर्षकता. शीर्षकानुसार विचार करण्यासाठी, अर्थ शोधण्यासाठी ते नकळतपणे परिणामकारक ठरते. लेखिकेच्या आयुष्यात आलेले अनुभव, आठवणी आणि प्रसंग यांची त्या जेव्हा आपल्या लिखाणातून मांडणी करतात तेव्हा त्या मांडणीत लेखिकेचे संवेदनशील मन शब्दाशब्दांतून व्यक्त होत राहते.

त्यांच्या प्रत्येक लेखातील शब्दरचना अतिशय सुंदर, आकर्षक आणि काव्यमय असून त्यांच्या, 'समुद्रात विरघळलेला चंद्र' या एका लेखात त्यांनी चंद्राचे घर म्हणजे समुद्र आहे, ही जी प्रतिमा योजलीय, त्याने कोणताही रसिक वाचक त्यांच्या त्या लेखावर फिदा होईल.

याच पुस्तकात ‘शिशिरोत्सव’ हा सुरेख लेख असून त्यात त्यांच्या वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेशाच्या कालावधीआधीचा घटनाक्रम शब्दबद्ध केला आहे. स्वत:च्या अनुभवातून आणि दृष्टिकोनातून हा विषय मांडताना त्यात त्यांनी स्वत:च्या रूपातल्या एका कोवळ्या मुलीचे अनुभवविश्व प्रगल्भतेने व्यक्त केले आहे.

आपले स्वत:चे शाळकरी वय ते एक यशस्वी वैद्यकीय व्यावसायिक म्हणून आयुष्य समृद्धपणे जगत असताना त्या टप्प्यातील त्यांच्या आयुष्यातील काही घटना, आठवणी, त्यादरम्यान त्यांनी अनुभवलेला निसर्ग, निसर्गाचे रौद्र रूप असे सारे काही त्यांनी अतिशय असोशीने लिहिले आहे.

कुमारवयीन आठवणी लिहिताना त्यांना सांगितले गेलेले ‘बारावीनंतर शिक्षण होणार नाही’ हे भविष्य आणि नंतर त्यांची कासावीस अवस्था, त्यावर त्यांनी मिळवलेला विजय, मुंबईचा पाऊस, समुद्रकिनाऱ्यावरची एक रात्र, दुभाषी यांचे ज्यांच्याशी लग्न झाले ते डॉक्टर सर्वेश, गोव्याची संस्कृती, तिथली बोलभाषा, तिथले रूढ शब्द, असे बरेच काही या संग्रहात आहे.

हिरव्यागार निसर्गाच्या सान्निध्यात जगणारी ही लेखिका, मन प्रसन्न करणाऱ्या शब्दांच्या अविरत बहराने मराठी साहित्याच्या ललित लेखनात आपल्या शब्दांचा आगळा असा सुगंधी मोहोर घेऊन अवतरली आहे.

या पुस्तकाला नितळ पाण्याची प्रचिती देणारे सागर नेने यांनी चितारलेले मुखपृष्ठही लोभस आहे.

राजहंस प्रकाशनाची ही एक उत्तम निर्मिती आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**रवींद्र तांबोळी,** पुणे


**मुखपृष्ठ, मुखपृष्ठाच्या आतील पान, मलपृष्ठ व मलपृष्ठाच्या आतील पानावरील पुस्तकांविषयी...**

- लोकमाता गोदावरी — किंमत : ₹ ७५०/-
  चंद्रकला कुलकर्णी, एल. के. कुलकर्णी
- कॅडबरी — किंमत : ₹ ३८०/-
  निकेतन तावडे
- चित्तथरारक — किंमत : ₹ ४००/-
  हेमंत गोडसे
- मोसाद मोहिनी — किंमत : ₹ ३००/-
  विलास फडके

## 'राजहंसी' पुस्तकविश्वातील अपडेटसाठी

Website : www.rajhansprakashan.com

इथेही तुम्ही 'राजहंस'ला भेटू शकता...

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा
**'राजहंस ॲप'**

Download on the App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

GET IT ON Google Play
अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी



# राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashaneditor@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अप्रुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

# चित्तथरारक

## हेमंत गोडसे

अफाट आर्थिक उलाढाल करणारं कॉर्पोरेट जग !
इथं माणसं विकली जातात आणि खरेदी केली जातात !
त्यात फक्त पैसाच गुंतलेला नसतो तर गुंतलेले असतात अनेक भलेबुरे लोक.
अडकलेली असतात वेगवेगळ्या पातळ्यांवरची नाती.
पणाला लागतात नीति-अनीतिची परिमाणं.
घडवल्या अन् बिघडवल्या जातात कायद्याच्या चौकटी.
या चौकटींच्या एका टोकाला कुठलाही विधिनिषेध न बाळगता
हिंसेचं थैमान घालणारे क्रूर दहशतवादी ;
तर दुसऱ्या टोकाला कारस्थानाची फोड करत,
धागा धागा उलगडत त्याचा वेध घेणारा पोलीस अधिकारी.
निर्दय अन् अमानुष कॉर्पोरेट जगाचा वेध घेणारी,
वाचकाला खिळवून ठेवणारी उत्कंठावर्धक कादंबरी...



Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P. COLLEGE PO, Pune)
Periodical post

# मोसाद मोहिनी

विलास फडके




डिमोना ही इस्त्रायलची छुपी अणुभट्टी. तिचं रहस्य 'दि संडे टाइम्स' या दैनिकासमोर उघड करणारा इस्त्रायली जागल्या मोर्देचाई व्हॅनुनू. पण हे इस्त्रायलला कसं चालणार ?
मग त्यानं एका मदनिकेकरवी व्हॅनुनूवर टाकलं सौंदर्याचं जाळं. तिला स्वतःच्या जाळ्यात ओढून 'मोसाद' या गुप्तचर यंत्रणेला व्हॅनुनूचं अपहरण करण्यात मदत करणारी चेरील बेंटॉव्ह उर्फ सिंडी.

युनायटेड स्टेट्स, फ्रान्स, बेल्जियम आणि दक्षिण आफ्रिका या राष्ट्रांनी इस्त्रायलला आण्विक ज्ञान आणि तंत्रज्ञान मिळवण्यात गुप्तपणे कशी मदत केली? अशा अनेक प्रश्नांचा वेध घेत इस्त्रायलच्या 'मोसाद' या गुप्तचर यंत्रणेचं क्रूर जाळं छेदणाऱ्या
जागल्याची कहाणी ...

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**